
# Father's day च्या निमित्ताने




नाही विसरलो तुला...सारे सारे आठवतेय
अदृष्याशी जडलेले तुझे माझे नाते...

शाप घेतलेले उरी सारे साहीन
प्राक्तनाला माझ्या प्राजक्ताची एक ओंजळ वाहीन...

माझ्या मुक्या आसवांचे सर डोळा लपवीन...
तुझ्यासाठी ठेवीन मी इंद्रधनूची कमान...

रमेश तेंडूलकर

ही कविता रमेश तेंडूलकर यांनी कोणाला समोर ठेवून लिहीली आहे हे मला माहिती नाही. जेव्हा सचिन शतक झळकावल्यावर

आकाशाकडे एक क्षण नजर लावून ते शतक आपल्या वडिलांना समर्पित करतो तेव्हा मला या कवितेची आठवण आल्याखेरीज रहात नाही.

एका कार्यक्रमात सचिनने आपल्या वडिलांची हीच कविता अतिशय भावपूर्ण आणि उत्कटरीत्या सादर केली तो क्षण महाराष्ट्र टाइम्सच्या सौजन्याने आपल्या सर्वांचाच ठेवा बनला आहे.

या एका बाबतीत मला सचिन रमेश तेंडूलकर याचा हेवा वाटतो, आपल्या वडिलांचे ऋण इतक्या जाहीरपणे व्यक्त करण्याची संधी त्याला इतक्या वेळा मिळते म्हणून. आपल्याला अशा किती संधी मिळतात? महत्वाचं म्हणजे अशी संधी मिळाली तर वडिलांचं ऋण आपण जाहीरपणे मानतो का?

सांगे वडिलांची कीर्ती तो एक मूर्ख असं समर्थ रामदासांनी म्हटलं आणि वडिलांचं कौतुक सांगणंसुध्दा आपण वर्ज्य केलं. समर्थांचा उद्‌देश वेगळा होता. वडिलांची कीर्ती सांगण्यापेक्षा त्यांच्या वरचढ कर्तृत्व गाजवा असं त्यांना म्हणायचे होते. आपण तो भाग पार विसरुन गेलोय असं मला वाटतं.

आई आणि बाबा यांच्या नात्यात आपण पहिल्यापासून काहीतरी फारकत करतो का? आई नेहमी अगं-तुगं असते पण बाबा अहो-जाहो का होतात? लागलं किंवा दुखलं-खुपलं की आई-ग आणि भीती किंवा विस्मय वाटला की अरे बापरे म्हणणं ह्याची आपल्या नकळत आपल्याला सवय का लागते?

आईएवढीच काळजी आणि कौतुक बाबादेखील करतात पण आपल्या लक्षात रहातो त्यांचा वचक आणि धाक.

निदान आपल्या पिढीमध्ये तरी मराठी कुटुंबांमध्ये वडील आणि मुलं यांच्यात दरारा आणि धाक प्रेमापेक्षा जास्त visible असायचा. आता ह्यात नक्कीच बदल झाला आहे. हळूहळू हे अंतर कमी झालं, पुत्राला मित्रवत् मानलं तरी कुठल्याच पिढीत मुलांच्या बाबतीतली काळजी आणि कौतुक बाबांच्या मनातून कधीच कमी होत नाही फक्त ते न दिसू देणं हाच पुरुषार्थ असं आपण मानतो.

आपल्या मुलांची प्रगती व्हावी त्यांनी आपल्यापेक्षा पुष्कळ पुढे जावे इतकीच त्यांची अपेक्षा असते. गुरूच्या बाबतीत शिष्यात् इच्छेत् पराजयम् असा श्लोक आहे. वडिलांच्या बाबतीत असा श्लोक लिहीण्याची गरजच वाटली नसावी मुलं आपल्या पुढे जाणं ही अध्याहृत अपेक्षा असते कारण हा पराजय नसतोच तर दोघांचाही विजय असतो. ज्या वडिलांना आपली मुलांनी आपल्यापेक्षा प्रगती केल्याचं प्रत्यक्ष बघायचं भाग्य मिळतं त्यांचा मला खूप हेवा वाटतो. मी ज्या पगारावर रिटायर झालो, त्या पगारावर माझ्या इंजिनियर मुलीने नोकरीला सुरुवात केली असं सांगताना वडिलांच्या डोळयात तरळलेले अश्रू हे माझ्या मनावर कायमचं कोरलं गेलेलं दृष्य आहे.

बा. भ. बोरकरांनी अतिशय तरुण वयात साहित्यसंमेलनात सादर केलेली कविता ऐकून भा. रा. तांबे आणि कवी चंद्रशेखर माधव ज्यूलियन यांना म्हणाले, "माधवराव, मुलं आपल्या फार पुढे गेली". हे उद्गार ऐकताना वाटलेल्या भावनांचे बोरकर यांनी एका लेखात फार छान वर्णन केले आहे.

आपण कितीही मोठं झालो तरीही वडील आपली protective भूमिका सोडत नाहीत. कधीतरी ते जरा अतीच होतंय असं वाटतं पण मनातल्य मनात ते संरक्षक, आश्वासक कवच आपल्याला हवंहवंसं वाटत असतं.

*बाकी सर्वजण आपली वारेमाप स्तुती करत असले तरी वडील सहसा हात राखूनच कौतुक करतात. हा त्यांच्या व्यक्तित्वाचा एक भागच बनून गेलेला असतो. हा विशेष आपली पिढीसुध्दा चालू ठेवते आहे.*

*प्रा. रमेश तेंडूलकर यांनी म्हटल्याप्रमाणे नियतीच्या सगळया शापांपासून आपल्या कुटुंबाला वाचवण्यातच या माणसाने आपली सगळी शक्ती पणाला लावलेली असते. आपली आसवं जगालाच काय पण आपल्या मुलांनाही जाणवू नयेत यासाठी त्याने धडपड केलेली असते.*
*हे नियतीचे शाप आपल्या मुलांना भोवू नयेत म्हणून सगळं सहन करताना तो नियतीला प्राजक्ताची ओंजळ अर्पण करतो आपला कडवटपणा मनातल्या मनात ठेवून.*

*कधीकधी गणितं चुकतात, दुरावा निर्माण होतो बापलेकांमध्ये. कबीरासारखा संत देखील निराशेने (मुलाने वाण्याचा धंदा सुरू केल्यावर ) बुडा बंस कबीरका (कबीराचा वंश बुडाला) असं लिहून जातो. पण अंतर्यामी वडिलांच्या हृदयातली मुलांबद्दलची काळजी काही कमी होत नाही.*

*काहीही झालं तरी आपल्या मुलांसाठी इंद्रधनूची कमान उभारायचा वडिलांचा अट्टाहास कुठलाही देश, काल, संस्कृती याच्या पलिकडे आहे. कुठल्याही घरात, कुटुंबात, देशात वडिलांची भूमिका तीच होती, आहे आणि असेल.*

*आपण सर्वांनीच आईच्या काळजाची गोष्ट वाचली आहे. मला वाटतं, ते वडिलांचं काळीज असतं तरीही गोष्टीत काहीच फरक पडला नसता.*

***मन्दार***